महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क
MAHARASHTRA MANDAL NEW YORK

तुमचं-आमचं, आपलं मंडळ! 'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क'

# स्नेहदीप

## जानेवारी २०२१




नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !




# स्नेहदीप

न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाचे त्रैमासिक
वर्ष ११, अंक १ - जानेवारी, २०२१



## स्नेहदीप संपादक मंडळ

| | |
|---|---|
| **संपादक:** | नीता नाबर |
| **संपादक मंडळ:** | किनी प्रभाकर,<br>डॉ. सोनिया शेट्ये |

**महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क कार्यकारिणी**

**अध्यक्ष:** किनी प्रभाकर

**उपाध्यक्ष:** जया बहाडकर

**कार्यवाह:** आशिष माटे

**कोषाध्यक्ष:** डॉ. सोनिया शेट्ये

**कार्यक्रम समन्वयक :** सुमित कोपर्डे

**विश्वस्त-** मानसी करंदीकर, दिलीप शेट्ये

**MMNY सुवर्णमहोत्सव**

**बोधचिन्ह - श्री. जयंत विठ्ठल कुळकर्णी**

**बोधवाक्य - सौ. वीणा जयंत कुळकर्णी**

**स्नेहदीप: जाहिरात दर**

| | |
|---|---|
| संपूर्ण पान: | $70.00 |
| अर्धे पान: | $40.00 |
| पाव पान: | $25.00 |
| अष्टमांश पान: | $15.00 |

**वार्षिक जाहिरातींस १० टक्के सवलत आहे.**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| मुखपृष्ठ - मधुमिता सेन, अनुक्रमणिका चित्र - जालावरून साभार | |
| अध्यक्षीय - किनी प्रभाकर | ३ |
| संपादकीय - नीता नाबर | ४ |
| Upcoming Program (AGM) | ५ |
| यशोगाथा - दर्शना प्रभुतेंडोलकर | ६ |
| माया - शिल्पा इनामदार आर्ते | ८ |
| MMNY on Facebook - Kini Prabhakarr | ९ |
| कविता - दर्शना प्रभुतेंडोलकर, शिल्पा इनामदार आर्ते | १० |
| पाककृती - Chicken Parmesan - प्रीती बाणावलीकर | १३ |
| बाल /युवा विभाग - भाग्यश्री प्रभुतेंडोलकर | १४ |
| नोव्हेंबर शब्दकोड्याचे उत्तर, जानेवारी शब्दकोडे - विनायक दामले | १५ |
| नोव्हेंबर कोड्याचे उत्तर, जानेवारी कोडे | १८ |
| जोडीदार (वधूवरसूचक सदर) | २० |
| संस्कृत सुभाषित | २० |
| दिवाळी २०२०, रंगदीप प्रकाशन व आर्या आंबेकर कार्यक्रम छायाचित्रे | २१ |
| १ नोव्हेंबर २०२० ते ३१ जानेवारी २०२१ मधील काही महत्वाचे दिवस | ३० |


**स्नेहदीप: संपादकीय धोरण**

- स्नेहदीप दर वर्षी जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर/नोव्हेंबर महिन्यात प्रकाशित होईल.• स्नेहदीपसाठी कथा, कविता, प्रवासवर्णन, लेख व इतर साहित्याचे स्वागत आहे. साहित्य info@mmny.online या पत्त्यावर ई-मेलने पाठवावे. साहित्याचा मोबदला दिला जात नाही
- साहित्य मराठी किंवा इंग्रजीत असावे. मराठी टंकलिखित साहित्य कोणत्याही युनिकोड फॉंटमधे असणे आवश्यक आहे. हस्तलिखित साहित्य स्कॅन करून पाठवावे. सर्व साहित्य ठराविक तारखेच्या आत पाठवावे.
- प्रकाशित साहित्यातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
- साहित्य प्रकाशित करण्याबाबतचा, तसेच साहित्यात किरकोळ दुरुस्त्या व कपात करण्याचा अधिकार संपादक मंडळाकडे आहे.
- साहित्याची निवड करताना न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाच्या आजी व माजी सभासदांच्या साहित्याला प्राधान्य देण्यात येईल.
- स्नेहदीपमधील जाहिरातींतील उत्पादने व सेवांसाठी महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क कोणत्याही प्रकारे जबाबदार नसेल.

# अध्यक्षीय

## सप्रेम नमस्कार!

२०२१ चा 'स्नेहदीप' चा हा पहिला अंक आणि 'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क' ची अध्यक्ष म्हणून माझा तुमच्याशी हा शेवटचा संवाद. २०१८ मध्ये 'महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क' च्या अध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतल्यापासून बघता बघता तीन वर्षं झाली. २०१४ मध्ये मंडळात आल्यापासून समिती, Master of Ceremony(MC), सेक्रेटरी आणि अध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या निभावताना, एका कुटुंबासारखंच असणाऱ्या ह्या मंडळाने मला गेल्या सात वर्षांत खूप मोलाच्या आठवणी दिल्या. अर्थात,मंडळाच्या कार्यक्रमांना येऊन तुमच्याशी प्रत्यक्ष भेट होण्याची पण वाट बघतेय. मंडळाच्या उपक्रमांना माझ्या साथीदारांनी, मंडळाच्या सर्व मेहनती सहकाऱ्यांनी, त्यांच्या कुटुंबियांनी भरपूर मेहनत घेतली, प्रत्येक कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी नि:स्वार्थपणे झटले याची मला पूर्ण जाणीव आहे, म्हणून मी व्यक्तिश: त्यांची ऋणी आहे. आज तुमचा निरोप घेताना माझं हृदय पूर्ण समाधानी आहे. तेंव्हा प्रिय सभासदांनो, असाच प्रेम, स्नेह, साथ, सहकार्य, सदिच्छा आणि आशीर्वादाचा वरदहस्त पुढील कमिटीवरही ठेवाल आणि जास्तीत जास्त कार्यक्रमांना उपस्थित राहून आपलं मंडळ असंच पुढची पन्नास वर्षं साजरी करेल हा मला विश्वास आहे.
दिलीप शेट्ये, मानसी करंदीकर, जयाताई बहाडकर, आशिष माटे, सोनिया शेट्ये, सुमित कोपर्डे, नीता नाबर या सर्व सहकाऱ्यांचे, तसेच सभासद, जाहिरातदार, देणगीदार, या सर्वांना मनापासून धन्यवाद.

'विश्वास, सचोटी, ऐक्य' हे ब्रीदवाक्य समोर ठेऊन मी आणि माझ्या समितीने काम केलं, तर या सहप्रवासाचं श्रेय मी त्यांनाच देईन. मंडळी, आंतरिक समाधान देणाऱ्या या प्रवासाचे तुम्ही महत्वाचे घटक आहेत. जीवनाचं रहाटगाडगं अनाहत चालू राहील. २०२१ मध्ये कोविड सारख्या रोगातून सर्व जगाला मुक्तता मिळून नवीन दशक सुखमय होवो ही प्रार्थना!
असाच लोभ असू द्या ही विनंती करून मी आपला निरोप घेते.




स्नेहांकित,

किनी प्रभाकर
अध्यक्ष: 'महाराष्ट्र मंडळ, न्यूयॉर्क'

# संपादकीय

नमस्कार मंडळी !

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

इ. स. २०२० हे आव्हानात्मक वर्ष संपून २०२१ हे आशादायी वर्ष सुरू झालं आहे. बऱ्याच देशांत कोरोनावरील वेगवेगळ्या लसींचा वापर सुरू झाला आहे. नवीन लसीही लवकरच उपलब्ध होणार आहेत. काही देशांमध्ये सामुदायिक रोगप्रतिकारशक्तीही निर्माण झाल्यासारखी वाटते आहे. ह्या सकारात्मक पार्श्वभूमीवर MMNY व स्नेहदीप समितीही नव्या जोमाने कामाला लागली आहे. मधुमिता सेन यांचं मुखपृष्ठही ह्या नव्या पहाटेचं उल्हसित वातावरण दाखवत आहे.

’स्नेहदीप’च्या या अंकात, दर्शना प्रभूतेंडोलकर व शिल्पा इनामदार-आर्ते यांचे लेख व कविता, प्रीती बाणावलीकर यांची पाककृती, भाग्यश्री प्रभूतेंडोलकरची युवा विभागातील कविता, विनायक दामले यांचं ’महा’ या सूत्राभोवती गुंफलेलं शब्दकोडं, कोडं, सुभाषित, मागील कार्यक्रमांची छायाचित्रे, १ जानेवारी २०२१ ते ३० एप्रिल २०२०१ पर्यंतच्या काही महत्त्वाच्या तारखा, MMNYच्या Facebook pageविषयीची माहिती, आगामी कार्यक्रमाची (AGM) माहिती हे सर्व तुम्हाला वाचायला मिळेल.

या अंकातील ’जोडीदार’ या सदराचे नियम जरूर पहावे व नवीन विवाहबंधने जुळवून आणण्यासाठी या सदराचा उपयोगही करावा. आपल्याला आत्तापर्यंतच्या ’स्नेहदीप’च्या अंकांबद्दल काही कळवायचे असल्यास info@mmny.online या ई-मेल पत्त्यावर जरूर कळवावे. आम्ही ते ’वाचकांच्या प्रतिक्रिया’ या सदरात छापू. मात्र प्रतिक्रिया थेट वाचकाकडूनच आली पाहिजे व ती स्नेहदीपमध्ये छापण्याची स्पष्ट सूचना केलेली असावी.

’स्नेहदीप’चा हा अंक वाचकांना आवडेल अशी आशा; आणि MMNY समितीचे, व स्नेहदीप साकारण्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

कोरोनावरील लसी परिणामकारक ठरोत व/वा सामुदायिक रोगप्रतिकारशक्ती उत्पन्न होवो आणि सर्वांचे जीवन पूर्ववत, सुरळीत होवो ही प्रार्थना !

काळजी घ्या व सुरक्षित रहा ! लवकरच online, किंवा जमल्यास प्रत्यक्षही भेटूया.

**- नीता नाबर**




=====================================================

## Upcoming Program:

**Dear MMNY members,**

**Please join us to welcome Maharashtra Mandal, New York (MMNY) Executive Committee for the upcoming Two years 2021-2022 via zoom meeting. Let us spread Love on Valentine's Day and take MMNY to a higher level.**

**<u>*When:</u> Sunday, February 14, 2021**
**<u>*Place:</u> Online (Zoom details will be shared soon) Life members and 2019 members can join.**

**<u>*Time:</u> 10 AM to 12 PM**

**<u>Meeting Agenda:</u>**
***Call for the meeting and review of the Agenda by the current President: Kini Prabhakar**
***Annual Report**
***Appointment of the Third Trustee.**
***Introduction of incoming 2021 MMNY Executive Committee.**

**We are looking forward to seeing all members and welcoming the 2021 committee!**

**Sincerely,**
**MMNY EC 2018-2020**

=====================================================

# यशोगाथा

**(पुस्तक परीक्षण : 'देश विदेशात गाजलेल्या स्त्रिया' लेखिका - आशा परूळेकर)**



जगाच्या इतिहासात अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या, आजही आहेत व भविष्यातही त्या आपल्या थोर कार्याने नवीन इतिहास घडवणार. एका स्त्री प्रकाशिकेने प्रकाशित केलेले व एका स्त्री लेखिकेने लिहिलेले हे पुस्तक. ते सुद्धा दहा कर्तृत्ववान स्त्रिया ज्यांनी 'मरावे परी कीर्तिरूपी उरावे' ही उक्ती अक्षरशः सार्थ केली. आशा भोसले ह्यांच्या सुमधुर आवाजाची जादू आजही आपण अनुभवतो.

या पुस्तकात राजकारण, साहित्य, कला, समाजसेवा इ. क्षेत्रांत आपले अस्तित्व स्त्री कसे सिद्ध करू शकते याचा संक्षिप्त परिचय लेखिकेने केलेला आहे. ॲगाथा ख्रिस्ती, आशा भोसले, बेनझिर भुट्टो, प्रिन्सेस डायना, इंदिरा गांधी, डॉ. मारिया मॉंटेसरी, बेगम अख्तर, हेलन केलर, मदर तेरेसा ह्या सर्वांनी जनमानसावर आपला ठसा उमटवला आहे. देशाच्या प्रगती, संस्कृती व समाजसुधारणेत या स्त्रियांनी मोलाचे योगदान दिले आहे.

स्त्री ही आपले स्त्रीत्व सांभाळून देशाचे राजकारण सांभाळू शकते. आपल्या आयुष्यात अनेक वादळे येतात व जातात, पण त्यांना कसे सामोरे जायचे हे सर्व आपण हे पुस्तक वाचताना अनुभवतो.

मेहनत, दृढनिश्चय, आपल्या अंगभूत असलेल्या गुणांचा विकास कसा करावा हे सर्व आपण या पुस्तकातून शिकतो. 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' असे आपण मदर तेरेसा यांचे वर्णन करू शकतो. सेवाव्रत व त्याग यांची त्या मूर्तीच. मारिया मॉंटेसरी यांनी मुलांना प्रभावी व यशस्वीपणे कसे शिकवावे हे जगाला दाखवून दिले. हेलन केलरने अंध, मूकबधिरांना नवी प्रेरणा दिली. नव्या पद्धतीने अध्ययन करण्याचा मार्ग दाखवला.

हे पुस्तक लहान मुले, पुरूष, स्त्रिया सर्वांना बोध व ज्ञानपर असे आहे. खाजगी व लौकिक आयुष्यात सुवर्णमध्य कसा साधावा हे आपल्याला या पुस्तकातून उमगते..

सर्वांनी ह्या पुस्तकाचा मनमुराद आनंद घ्यावा असे मला मनापासून वाटते.

**दर्शना प्रभूतेंडोलकर**

('महाराष्ट्र टाईम्स'च्या सौजन्याने)

# माया

आपल्या लेकीच्या हातातल्या त्या दोन महिन्याच्या बाळाकडे बघून सुशीलाबाई बोलल्या, “अगं काय इतका विचार करतेस, जा उद्यापासून तू ऑफिसला. मी सांभाळीन हो माझ्या नातीला.“ त्या वेळेस कोणती वेळ होती माहीत नाही पण नियतीने त्यांचे बोल अक्षरश खरे केले, थोडीथोडकी नाही तर तब्बल त्या नातीचे लग्न होईपर्यंत त्यांचा आणि तिचा गोफ कायमचा विणला गेला.

दादरच्या दुर्गाप्रसादच्या दोन खणी चाळीत आणि बारा माणसांमध्ये तो दोन महिन्यांचा जीव अलगद सामावून गेला. काय नव्हते त्या घरात ? प्रेम करणारे आजी आजोबा, लळा लावणारे मामा मावशी, आणि जिव्हाळ्याचे शेजारी ! आपली लेक तिच्या संसारासाठी नोकरी करते याची पूर्ण जाणीव त्यांना होती म्हणून भक्कमपणे त्यांनी नातीला सांभाळायचा निर्णय घेतला.

वय आणि वेळ कोणासाठीही थांबत नाहीत. दादरच्या प्रसिद्ध बालमोहन विद्यामंदिर शाळेमध्ये तिच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला आणि बघता बघतां त्या शाळेत ती रमून गेली. दर सुट्टीत आई बाबांकडे राहायला जाणे हाच काय तो तिचा आणि सुशीलाबाईंचा विरहाचा काळ ! पण नातीला सुद्धा आजीला सोडून जास्त दिवस राहावत नसे. नातीपाठोपाठ त्यांचा नातूही आजीकडे राहायला आला. त्यांच्या लेकीचे मात्र कशासाठी पोटासाठी चालूच होते.

पोटच्या गोळ्यांना दूर ठेवून नोकरीसाठी केलेली तिची वणवण कामी आली आणि त्यांच्या लेकीने ठाण्याला मोठी जागा घेतली. तसेच आपल्या मुलांना तिथे घेऊन जाण्याचेही ठरवले, आता खरी कसोटीची वेळ होती. तोपर्यंत बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले होते. आपली दोन मुले, आपला नवरा आणि धाकट्या मुलीचा जावई यांचे डोळ्यादेखत झालेले मृत्यू सुशीलाबाईंनी पचवले होते पण नातवंडांवरचे त्यांचे प्रेम मात्र कायम होते. शेवटी तिची लेक त्यांना आपल्या घरी ठाण्याला घेऊन आली.

उतारवयातल्या सुशीलाबाईंना अखेर देवाने दिलेला हा न्याय होता. त्यात लेकीच्या जवळच त्यांची लहान बहीण सुमनही राहायला आली होती. आता कुठे आयुष्य शांतपणे जगण्याची संधी त्यांना मिळाली आणी त्या आपल्या लेकीच्या संसारात रमून गेल्या. अजूनही तिची नोकरी चालू होती आणि अजूनही त्या आवडीने नातवंडांचे हट्ट पुरवत होत्या. असे काय होते त्यांच्याजवळ की त्या या सर्वातून निभावून गेल्या?

पुण्याच्या प्रसिध्द दिघे घराण्यातला त्यांचा जन्म. सर्व भावंडांत या मोठ्या, त्यामुळे भाचरांची ताईआत्या विशेष लाडकी ! आपलेपणा, माया, जिव्हाळा या सर्वांचा वारसा घेऊन त्या लग्नानंतर दादरला आल्या आणि स्वत:चा संसार करता करताच दिराचाही संसार आपलासा केला. काही कारणास्तव दिराची नोकरी गेली पण त्यांनी पुतण्यांना मात्र उघड्यावर पडू दिले नाही. त्यांना मायेची पाखर घातली, इतकी की ते कालांतराने सुशीलाबाईंनाच आई म्हणू लागले. आयुष्यभर त्यांनी आईपण निभावले. कधी स्वतःच्या मुलांचे कधी पुतण्यांचे तर कधी नातवंडांचे ! त्यांची सगळ्यात मोठी शिदोरी म्हणजे सर्वांवर प्रेम करायची वृत्ती ! हीच शिदोरी त्यांना आयुष्यभर पुरली.

सुशीलाबाईंना स्वर्गवासी होऊन वीस वर्षे झाली पण आजही त्यांची नात त्यांच्या आठवणीने टिपं गाळते, तिच्या प्रेमाच्या गोष्टी आपल्या लेकाला सांगते.

तर अशी माझी आजी सुशीलाबाई रणदिवे हिची ही साठा उत्तराची कहाणी सुफळ संपूर्ण !!!!!!!!

**शिल्पा इनामदार आर्ते**

==========================================================

Maharashtra Mandal NY is now on Facebook. Search for “Maharashtra Mandal NY” on Facebook. Please support the organization by clicking “like” button.

You will find the latest news, up-coming events, pictures and useful information on the page. The facebook link is

https://m.facebook.com/maharashtramandal.ny

**- Kini Prabhakarr**

==========================================================




देशाचे भावी शिलेदार तुम्ही,

डोळ्यांत हजारो स्वप्ने पाही.

मनगटात जोर भारी,

मनं घेते उंच भरारी.

नवनवीन तंत्रज्ञान आज तुमच्या दारी,

पण जाऊ नका कधी आहारी.

होतील स्वप्ने साकार तुमची,

जिद्द सोडू नका कधी तुमची.

आधारस्तंभ उद्याचे तुम्ही,

कोलमडून जाऊ नका कधी.

घालताना आकाशाला गवसणी

नाळ तोडू नका ह्या धरतीशी.

अपयश ही यशाची पहिली पायरी,

ठेवा स्वीकारण्याची तयारी.

आयुष्य हे अडथळ्यांच्या शर्यतीचे,

ऊन-पावसाच्या तडाख्याचे.

शिवरायांचे वंशज तुम्ही,

आठवावा प्रताप त्यांचा तुम्ही.

अंधाराचे ढग ओसरीता होते सोन्याची सकाळ,

मौन सोडून व्यक्त व्हा,

मार्ग सापडेल निःसंदेह.

होतील स्वप्ने साकार तुमची,

पाठलाग कराया सोडू नका कधी.

करा शून्यातून विश्वाची निर्मिती,

आकार द्या स्वप्नांना,

पंख पसरूनी आभाळात घ्या गरूडभरारी,

बळ हवे तयांसी निर्धाराचे, विश्वासाचे.

येतील अनेक चढउतार वाटेवरती,

काट्याकुट्यांचे मार्ग खडतर,

भिऊ नकोस तरीही,

काट्यांशिवाय गुलाब दिसले आहे का कधी ?

**दर्शना प्रभूतेंडोलकर**

# अंतर

इतक्यात कडाडून भेटलो नाही
आज नव्याने भेटू पुन्हा
काळजातील जुने निखारे
चल नव्याने पेटवू पुन्हा

चंद्र आहे आसमंती
सागरासही उधाण भरती
चांदण्यांच्या बाराखडीला
चल नव्याने गिरवू पुन्हा !!

तुझे माझे सखेसोबती
आहेत अजून अवतीभवती
अंगणात मांडून खेळ
चल नव्याने जिंकू पुन्हा !!

श्वास कीती राहीले आता
मोजमाप न त्याचे करु
दोन श्वासातले हे अंतर
चल नव्याने मिटवू पुन्हा

**शिल्पा इनामदार आर्ते**

# Chicken Parmesan



**Ingredients:-**

2 boneless, skinless chicken breast halves

1/2 cup butter

3/4 cup Italian seasoned dry bread crumbs

1 jar (26 ounces) marinara sauce

1 cup Parmesan -or- shredded Mozzarella cheese

**Procedure:-**

Preheat oven to 400°F.

Dip chicken in butter, then bread crumbs, coating well.

In a glass baking dish, arrange chicken.

Bake uncovered 20 minutes.

Pour the marinara sauce over chicken, then top with cheese.

Bake an additional 10 minutes or until chicken is no longer pink.

Serve if desired, with hot cooked pasta.

**- प्रीती बाणावलीकर**

www.pritiskitchen.weebly.com



the whispers in your dreams
are real,
the voice that echoes in your heart
is as true as the faith that the
world believes in,
the silent prayers of the night
are being indeed heard,
and that some angel shall,
always come to your rescue.

bhagyashree

**भाग्यश्री प्रभूतेंडोलकर**

(वय १७ वर्षे)

# स्नेहदीप नोव्हेंबर २०२० शब्दकोड्याचे उत्तर (‘पाच’ ह्या सूत्राभोवती गुंफलेले)

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | ■ | १. पं | चां | ग | ■ | २. पं | ३. क | ४. ज | ■ | ५. स | ■ | ६. पां | ७. चा | ली |
| ८. प्र | ९. पं | च | ■ | ■ | १०. पं | चा | क्ष | री | ■ | ११. ड | म | ड | म | ■ |
| १२. व | च | ■ | १३. पं | १४. चा | ■ | न | ■ | १५. प | द | क | ■ | १६. व | र | द |
| १७. रा | म | १८. पं | चा | य | १९. त | न | ■ | ट | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ |
| सं | ■ | २०. च | र | ■ | नु | ■ | २१. न | का | २२. शा | ■ | २३. पां | चा | मु | २४. खी |
| २५. ग | र्भ | व | ती | ■ | ■ | २६. पं | थ | ■ | प | ■ | च | ■ | ■ | र |
| म | ■ | टी | ■ | २७. च | २८. र | खा | ■ | २९. खे | ■ | ३०. अ | वा | ३१. स्त | ३२. व | ■ |
| ■ | ३३. सो | ■ | ३४. ना | र | ळी | ■ | ३५. पां | च | ३६. ज | न्य | ■ | ३७. व | च | ३८. न |
| ■ | ब | ■ | ३९. च | ण | ■ | ४०. पं | ढ | री | ना | था | ■ | ४१. न | क | टी |
| ४२. पं | त | ४३. गे | ले | ■ | ४४. ना | च | रे | ■ | चे | ■ | ■ | ■ | ■ | ■ |
| च | ■ | ४५. ला | थ | ४६. मा | री | न | ■ | ■ | ■ | ४७. पा | ■ | ४८. य | ज्ञ | ■ |
| म | ■ | ■ | ४९. वे | द | ■ | द्या | ■ | ■ | ५०. पं | च | ५१. तं | त्र | ■ | ५२. श |
| ५३. हा | ५४. पू | ५५. स | ■ | ५६. क | ळ | ■ | ५७. अ | ■ | ५८. च | र | बी | ■ | ५९. सु | रा |
| ६०. भू | त | खे | ६१. त | ■ | ■ | ६२. पं | च | वि | शी | ■ | ■ | ६३. पं | जा | ब |
| त | ■ | ६४. द | वा | ■ | ६५. ह | जा | र | ■ | ६६. ल | हा | न | प | ण | ■ |

– विनायक दामले

# स्नेहदीप जानेवारी २०२१ शब्दकोडे (‘महा’ ह्या सूत्राभोवती गुंफलेले)



| आडवे शब्द : | उभे शब्द : |
|---|---|
| | |
| २. मोठे वर्तुळ, एसटी ----- | १. शिवाजी ---- |
| ५. जनाब, स्वामी, आदरार्थी | ३. एक ग्रह, शुभ--- |
| ८. शंकर, मोठा देव | ४. भीती, कर नाही त्याला -- कशाला |
| १०. फणस, आंबा फळांचा -- | ५. सह्याद्रीतील हिलस्टेशन |
| ११. वक्रतुंड ---- | ६. आरोळ्या, न्यूझीलंडमधील माओरींचा नाच |
| १२. ताराबाई किंवा येसूबाई | ७. हात |
| १३. राजवाडा, ताज--- | ९. कर्जाऊ रक्कम |
| १५. ह्यात बसून स्नान (इंग्रजी) | ११. जुगार पत्त्यांचा |
| १६. --शृंगार | १३. श्रेष्ठ माणूस, व्यापारी |
| १७. मोठी बोट, गलबत | १४. मक्केची यात्रा |
| १८. उज्जैनचे ज्योतिर्लिंग | १७. समूह, लोक |
| २०. विस्तव, ज्वाला | १८. ह्या राज्यात मुंबई आहे |
| २१. लोकांचा समूह | १९. ---गमत |
| २२. शास्त्रे किंवा रिपुसंख्या | २०. हल्ली, सध्या |
| २३. चांदी, सोने तार | २१. एकत्र जेवण, सहलीत |
| २४. होम | २६. वाडवडील |
| २५. मध्यप्रदेशातील गाव | २८. शहराचा मुख्य अधिकारी |
| २७. एक गुण | २९. वीज |
| २९. काठेवाड | ३०. अरण्य, बन |
| ३१. मला, ने --- ने परत मातृभूमीला | ३१. रायगड जिल्ह्यातील गाव |
| ३३. देणगी | ३२. रामायणातील नायिका |
| ३४. इजा | ३५. ठाण |
| ३७. मोठेपणा | ३६. शिवभक्तांचा उपासाचा दिवस |
| ३८. नदीला येतो, मोठा प्रवाह | ३७. कॉलेज |
| ४०. उंच डोंगर | ३९. प्राणयामातील एक भाग, दीर्घ श्वास |
| ४१. भारतीय चीज, पालक --- | ४१. धाव, घटकेचा भाग |
| ४३. बैठक घ्या सांगणे | ४२. दक्षिण भारतातील साधूपुरुष |
| ४५. मस्तक | ४३. आसन, बसण्याची जागा |
| ४६. मुंग्यांचे घर | ४४. सर्व, सगळेजण |
| ४७. ठकास ---- | ४६. एक दोष, पणतीला असते |
| ४८. बगळा (संस्कृत) | ४९. कळ्यांन उद्देशून, फुले बना |
| ४९. बागेत | ५०. नाटकातील मुख्य पात्र |
| ५१. मार, ठोक | ५३. हठयोगातील साधना |

| | |
|---|---|
| ५२. बटण किंवा वेदना | ५६. कोळी, मासे पकडणारा |
| ५४. दक्षिण भारतातील डोंगर | ५८. दोन नद्या मिळतात ते ठिकाण |
| ५५. पहिल्यांदा, -- कळस मग पाया | ६१. एक पदवी |
| ५७. मोठे, --राष्ट्र किंवा भाग्य | ६२. साधुसंतांची जागा |
| ५८. लिंबासारखे मोठे फळ, पण गोड | ६३. लाकूड, वृक्ष (संस्कृत) |
| ५९. योग्य | |
| ६०. रानडुक्कर, विष्णुचा अवतार | |
| ६२. स्वस्त नव्हे | |
| ६३. --अण्णा मालवणकर | |
| ६४. हर साल | |
| ६५. भीमरूपी ---- | |

**(शब्दकोड्याचे उत्तर १५ मार्च २०२१ पर्यंत info@mmny.online या ई-मेल पत्त्यावर पाठवावे. अचूक उत्तर पाठविणाऱ्यांची नावे पुढील अंकात प्रसिध्द करण्यात येतील.)**

**– विनायक दामले**

==========================================================

**स्नेहदीप नोव्हेंबर २०२० शब्दकोड्याचे उत्तर**

**खालील तीर्थक्षेत्रांची नावे ओळखा :**




१. शिरडी
२. काशी
३. बद्रीनाथ
४. गंगासागर
५. अमरनाथ
६. यमनोत्री
७. हरिद्वार
८. द्वारका

(जालावरून साभार)

==========================================================

# स्नेहदीप जानेवारी २०२१ कोडे

खाली दिलेल्या अक्षरांची जुळणी करून भारतातील राज्ये व राजधान्या लिहा

1 प्र नौ श उ र त दे ख ल
2 खं डे उ रा त रा ड न डु ह
3 य ज पु रा स्था र ज न
4 दि ढ पं ब जा चं ग
5 धी र ज गु न गां ग ग य रा
6 म मा प्र हि श सि च दे ला ल
7 का श्री ज र म्मू ग शमी न र
8 का रु बं क ग ट ला र्ना
9 म क प ल गा ल शचि बं ता क
10 प्र ळ म दे भो दय प श
11 है णा ब द्रा ते द लं ग
12 अ रा आं प्र धर व श ती म दे
13 ई चै ता डु ळ मि न्न ना
14 ति व नं रु अ पू ला त म र र के
15 ल मे य घा लॉ ग शि
16 टो गं सि म ग क क्की
17 हा ई ब म मुं ष्ट्र रा
18 सा दि पू स आ म र
19 हा णा ट पा बि र
20 वा जी प गो ण
21 झ झो मि ल रा ऐ वा म
22 इं म पू फा र ळ णि
23 स य ग छ रा र पू त्ती ड
24 आ पु ळा र त्रि ग रा त
25 लँ को मा ना ड गा हि
26 अ इ न णा रु टा र ग ल च
27 या चं ढ रि ह दि ना ग
28 रां ख झा ची ड र

29 भू ओ सा व र ने श्व रि

**प्रेषक – विनायक दामले**

(जालावरून साभार)

**(कोड्याचे उत्तर १५ मार्च २०२१ पर्यंत info@mmny.onlineया ई-मेल पत्त्यावर पाठवावे. अचूक उत्तर पाठविणाऱ्यांची नावे पुढील अंकात प्रसिध्द करण्यात येतील.)**

==========================================================

**जोडीदार (वधूवरसूचक सदर)**



(चित्र - MS Word ClipArt)

नमस्कार मंडळी, जानेवारी २०१४ पासून आम्ही स्नेहदीपमधे 'जोडीदार' हे नवीन सदर केले आहे. त्यात तुम्ही विवाहविषयक जाहिराती देऊ शकता. वधूची/वराची माहिती, वराबद्दल/वधूबद्दल अपेक्षा मराठी/हिंदी किंवा इंग्रजीतून info@mmny.online या ई-मेल पत्त्यावर पाठवावे. शब्दमर्यादा : २०० शब्द. **जाहिरातीत तुमची संपर्कविषयक माहिती (फोन/ई-मेल, इ.) द्यावी**. ई-मेल पत्त्यातून तुमचे नाव लोकांना कळू द्यायचे नसल्यास abc_123@yahoo.com अशा प्रकारचा, नाव जाहीर न करणारा, ई-मेल account सुरू करून वापरावा. **ज्यांना या जाहिरातींना प्रतिसाद द्यायचा असेल त्यांनी थेट जाहिरातदारांशीच संपर्क साधावा.** स्नेहदीप मध्यस्थी करू शकणार नाही. जाहिरातीतील वधू-वरांच्या माहितीबद्दल, तसेच जाहिरातींना प्रतिसाद देणाऱ्या लोकांबद्दल स्नेहदीप संपादक मंडळ किंवा महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क जबाबदार असणार नाही. स्नेहदीपच्या या सेवेतून नवीन स्नेहबंधने जुळून येतील अशी आशा करूया !

==========================================================

**सुभाषित :**

चलन्ति गिरयः कामं युगान्तपवनाहताः |
कृच्छ्रेऽपि न चलत्येव धीराणां निश्चला मतिः ||

**अर्थ :**

पर्वत (जरी वादळामुळे हलत नसले तरी) प्रलय काळातील झंझावातामुळे ते (सुद्धा) डळमळले तर खुशाल डळमळू देत, पण धैर्यवान, बुद्धिमान लोकांची स्थिर बुद्धी कुठल्याहि संकटात विचलित होत नाही.

==========================================================

# मागील कार्यक्रमांचा वृत्तांत

दिवाळीसाठी बालगोपाळांचा आणि त्यांच्या कलाकार पालकांचा रंगारंग नृत्य, नाट्य, संगीत याचा कार्यक्रम सादर केला तसंच दिवाळी अंक 'रंगदीप' चं ऑनलाईन प्रकाशन झालं, त्याची क्षणचित्रं आहेत. मंडळाच्या YouTube चॅनेल वर हे सर्व कार्यक्रम बघून आनंद घ्या.

https://www.youtube.com/channel/UCFNzp2la1EIA8nkcvyMwBXw

**बालगोपाळांच्या दिवाळी कार्यक्रमाची छायाचित्रं**










CHAITANYA RELEKAR
SOHAM BADARAYANI



**पालकांच्या दिवाळी कार्यक्रमाची छायाचित्रं**

















**'रंगदीप' २०२० ऑनलाईन प्रकाशन कार्यक्रमाची छायाचित्रं**

















२०२१ च्या पहिल्या सणाची, मकर संक्रांतीची सुरवात 'महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क' ने बृहन महाराष्ट्र ऑफ नॉर्थ अमेरिका पुरस्कृत, आर्या आंबेकर यांच्या सुमधुर आवाजात सुरेल गाण्यांचा कार्यक्रम केला.



==========================================================

**१ जानेवारी २०२१ ते ३० एप्रिल २०२१ मधील काही महत्त्वाचे दिवस (कालनिर्णय भारतीय आवृत्तीप्रमाणे)**

संकष्टी चतुर्थी : २ जानेवारी २०२१
मकर संक्रांत : १४ जानेवारी २०२१
प्रजासत्ताक दिन : २६ जानेवारी २०२१
संकष्टी चतुर्थी : ३१ जानेवारी २०२१
श्रीगणेश जयंती (विनायक चतुर्थी) : १५ फेब्रुवारी २०२१
छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तारखेप्रमाणे) : १९ फेब्रुवारी २०२१
अंगारक संकष्टी चतुर्थी : २ मार्च २०२१
महाशिवरात्री : ११ मार्च २०२१
होळी : २८ मार्च २०२१
धूलिवंदन : २९ मार्च २०२१
संकष्टी चतुर्थी, छत्रपती शिवाजी महाराज जयंती (तिथीप्रमाणे) : ३१ मार्च २०२१
गुड फ्रायडे : २ एप्रिल २०२१
ईस्टर संडे : ४ एप्रिल २०२१
गुढी पाडवा : १३ एप्रिल २०२१
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती : १४ एप्रिल २०२१
श्रीराम नवमी : २१ एप्रिल २०२१
महावीर जयंती : २५ एप्रिल २०२१
हनुमान जयंती : २७ एप्रिल २०२१
संकष्टी चतुर्थी : ३० एप्रिल २०२१

==========================================================

**सर्व आगामी सण-उत्सवांसाठी हार्दिक शुभेच्छा!**

स्नेहदीप संपादक मंडळ व महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क

==========================================================

(या अंकातील काही चित्रे जालावरून साभार घेतली आहेत. ज्या चित्रांचा मूळ मालकी हक्क माहीत असेल तो त्या त्या चित्राखाली निर्देशित केला आहे. इतर चित्रांच्या बाबतीत कॉपीराईट हक्कभंग होत असेल किंवा कोणाला काही आक्षेप असेल, तर आमच्याशी info@mmny.online या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधावा. आम्ही योग्य त्या मालकाच्या इच्छेप्रमाणे, त्या चित्राखाली त्यांचा ऋणनिर्देश करू किंवा ते चित्र काढून टाकू. MMNY किंवा 'स्नेहदीप' इतरांच्या चित्रांबद्दल श्रेय घेत नाही किंवा इतरांची चित्रे आर्थिक फायद्याकरता वापरत नाही. MMNY ही नॉनप्रॉफिट संस्था आहे व 'स्नेहदीप' हे मोफत ई-त्रैमासिक आहे.)

(Some pictures in this magazine are borrowed from web. When the source of a picture is known, we mention it under that picture. For other pictures from unknown sources, if anyone has any objection/copyright problem, please contact us at info@mmny.online We will mention the appropriate source name or remove the picture as per the owner's wish. MMNY or Snehadeep do not take credit for borrowed pictures nor do they use those pictures for financial gain. MMNY is a nonprofit organization and Snehadeep is a free e-magazine.)